# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 12/11/2022 (षनिवार) सकाळ**

## चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील के. ई. सि. गार्डनचौक, MIDC बोरी येथे दिनांक ११/११/२०२२ चे १८.०० वा. ते १८.१५ वा. सुमारास यातील आरोपी नामे– १) अरविंद अशोक चौधरी, वय २५ वर्ष २) नवनित बाबुराव दासरवार, वय २५ वर्ष, दोन्ही रा. टाकळघाट यांनी त्यांची मोटरसायकल क्रं एम.एच–३१/सि. झेड–१५५२ ने ०९ लोखंडी ॲगल व ०४ स्टिल रॉड किंमती अंदाजे ५०००/– रूपयाचा मुद्देमाल घेवुन जातांना मिळुन आल्याने त्यांना फिर्यादी यांनी थांबवुन विचारपुस केली असता त्यांनी सांगितले कि, सदरचा मुद्देमाल हा मखिजा कंपनी येथुन चोरी करून विक्री करीता घेवुन जात असल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रविंद्र राजाराम कडु, वय ३८ वर्ष, रा. सोनगाव यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन एमआयडीसी बोरी करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत ३० कि मी अंतरावरील मौजा नागलवाडी येथे दिनांक ११/११/२०२२ चे २०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुधाकर ढेकलु धुर्वे, वय ३६ वर्ष, रा. नागलवाडी व आरोपी नामे– जिवन केळवदे, रा. नागलवाडी हे एकाच मोहल्ल्यात राहत असुन नमुद घटना वेळी व ठिकाणी आरोपी हा दारू पिवुन फिर्यादीच्या घरासमोर येऊन विनाकारण फिर्यादीला शिवीगाळ करू लागला असता फिर्यादीने आरोपीस हटकले तेव्हा आरोपी याने फिर्यादीला हातबुक्क्याने मारपीट करून फिर्यादीच्या उजव्या डोळयाचे भोळीवर जखमी केले तसेच फिर्यादीची पत्नी नामे–वनदेवी सुधाकर धुर्वे, वय ३२ वर्ष, रा. नागलवाडी हिला सुध्दा दाताने डाव्या हाताच्या बोटाला चावा घेऊन जखमी केले. फिर्यादी व फिर्यादीच्या पत्नीस शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन खापा करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर